**मुंबई  महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३६व्या बैठकीचे कार्यवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२० नोव्हेंबर, २०१४ (गुरुवार)** |
| **वेळ** | **:** | **सकाळी १०.०० वाजता** |
| **सभास्थान** | **:** | **सहयाद्री राज्य अतिथीगृह,<br>बी.जी.खेर मार्ग,<br>मलबार हिल,<br>मुंबई - ४०० ००६.** |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री. देवेंद्र फडणवीस<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्रीमती स्नेहल आंबेकर<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| श्री. यशोधर फणसे<br>अध्यक्ष, स्थायी समिती  व<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. दिलीप पटेल<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. सीताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

श्री. संजय भाटिया — सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
सिडको

श्री. यु.पी.एस. मदान — सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री. नारायण मानकर
महापौर,
वसई-विरार शहर महानगरपालिका

श्रीमती कल्याणी नितीन पाटील
महापौर,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,

श्री. सुरेश टोकरे
अध्यक्ष,
रायगड जिल्हा परिषद

श्री. सुनील चौधरी
नगराध्यक्ष,
अंबरनाथ नगरपरिषद

श्रीमती  चारुशीला घरत
नगराध्यक्षा,
पनवेल नगरपरिषद

श्रीमती ऊषा म्हात्रे
नगराध्यक्षा,
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद,

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अतिरिक्त कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. अनिल डिग्गीकर
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या सदस्या मुंबईच्या महापौर, श्रीमती स्नेहल आंबेकर यांचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. संजय मोरे, महापौर, ठाणे महानगरपालिका, श्री. सुरेश टोकरे, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद व श्रीमती ऊषा म्हात्रे, नगराध्यक्षा, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी प्राधिकरणाचे 'अध्यक्ष' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

तसेच माजी नगर विकास राज्यमंत्री श्री. उदय सामंत, मुंबईचे माजी महापौर श्री सुनील प्रभू यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' तसेच माजी विधानसभा सदस्य श्री. नवाब मलिक व श्री.प्रशांत ठाकूर, यांनी प्राधिकरणाचे 'नामनिर्देशित सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

तसेच श्री. हरीश्चंद्र पाटील, माजी महापौर, ठाणे महानगरपालिका, श्रीमती कविता गायकवाड, माजी अध्यक्षा, रायगड जिल्हा परिषद, श्रीमती सारिका गायकवाड, माजी अध्यक्षा, ठाणे जिल्हा परिषद व श्रीमती स्नेहा पातकर, माजी नगराध्यक्षा, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी प्राधिकरणाचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेतील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३५व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करताना कार्यवृत्तातील बाब क्र.४ या विषयावर प्राधिकरणाचे सदस्य श्री.दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, ओशिवरा जिल्हा केंद्र येथील रस्त्याचे काम बंद आहे तसेच भू-विकासकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत व जोडरस्तेसुध्दा नाहीत. तसेच गटार लाईनचे काम केलेले नसून पुनर्वसनाच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले नाही.

यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर इमारती एस. आर. ए. कडून प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या आहेत. तेथे लिफ्टच्या समस्या नजरेस आल्या आहेत त्याचे कारण लिफ्टचा वापर बरोबर होत नाही किंवा तेथे राहणारे रहिवासी विजेचे देयक भरत नाहीत. ज्या ठिकाणी दुरुस्ती करण्याची गरज आहे त्या ठिकाणी प्राधिकरण दुरुस्ती करेल. त्यासाठी प्राधिकरणाने निविदा काढलेली आहे.

पुनर्वसनाच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिटबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले आहे व तेथील इमारतीला काहीही धोका नाही असे निदर्शनास आलेले आहे. तरी काही ठिकाणी काही दुरुस्त्या करणे अपेक्षित आहे.

प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, ज्याप्रमाणे प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलाचा विकास केलेला आहे त्याचप्रमाणे ओशिवरा जिल्हा केंद्राचा विकास करावा. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील जमीन ही शासनाची होती व ती शासनाने प्राधिकरणाकडे विनामुल्य दिली होती. त्या जमीनीला प्राधिकरणाने विकसित करुन वाटप केले आहे. ओशिवरा येथील जमीन खाजगी मालकीची असून वांद्रे-कुर्ला संकुलासारखा ओशिवरा जिल्हा केंद्राचा विकास करता येणार नाही.

प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असेही सांगितले की, ओशिवरा जिल्हा केंद्र येथील कचरा उचलण्याची जबाबदारी पार पाडली जात नाही. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कचरा उचलण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. यावर प्राधिकरणाचे सदस्य श्री. सीताराम कुंटे, महापालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, सदर इमारती ज्या विकासकांनी बांधलेल्या आहेत त्या इमारतींमधील पाईप लाईन तुटलेली आहे, पाण्याचे कनेक्शन तुटलेले आहे त्याचे काम पूर्ण करावयाचे आहे. ही कामे पूर्ण केल्यास महानगरपालिका साफसफाईची जबाबदारी घेण्यास तयार आहे. त्यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर दुरुस्तीचे काम लवकरच पूर्ण करुन महानगरपालिकेला सूचित करण्यात येईल.

चर्चेनंतर, कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३५व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल</u>**

कार्यवाही अहवालामधील अ. क्र.६ वर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. सुरेश टोकरे, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की, वांगणी-कर्जत हाळफाटा रस्त्याची पाहणी केली

असता असे आढळून आले की, रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले नाही. मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर रस्त्याची दुरुस्ती लवकर करुन घेण्याचे आदेश दिले.

प्राधिकरणाचे सदस्य, श्री.सुनिल चौधरी, नगराध्यक्ष, अंबरनाथ नगरपरिषद यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील ३००-३०० मिटरचे अंतर्गत रस्ते बांधण्याचे काम हात घ्यावे त्यामुळे शहरातील अंतर्गत वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल.

त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, रस्त्यांचे अंदाजपत्रक तयार झाले असून पुढील बैठकीत निर्णय घेण्यासाठी सादर करण्यात येईल.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : सुधारित मेट्रो मार्ग - ५ : वडाळा - घाटकोपर - तीन हात नाका (ठाणे) - कासारवडवली मेट्रो प्रकल्प : सविस्तर प्रकल्प अहवाल - प्रकल्प अंमलबजावणीकरीता शासनाची मान्यता घेण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेणेबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई उपनगरांमध्ये तसेच ठाणे शहर व जिल्हयांमध्ये येत्या २ ते ३ दशकात होणारी लोकसंख्येमधील वाढ, विकास आणि रोजगार वाढ तसेच नागरीकरणाचा विकास आणि उपनगरीय रेल्वे सेवेमध्ये राहणारी प्रवासी क्षमतेची तुट, आतापर्यंत रेल्वे आधारीत सेवा पोहोचू न शकलेल्या भागांमध्ये रेल्वे जाळे नेण्याची गरज लक्षात घेता, मुंबई उपनगरातील आणि ठाणे शहर जोडण्याकरीता सार्वजनिक जलद सेवा राबविणे प्रस्तावित आहे. सुरुवातीला हा मार्ग वडाळा ते तीन हात नाका, ठाणे पर्यंत प्रस्तावित होता. परंतू, त्यानंतर ठाणे शहराच्या विकासाच्या प्रगतीचा विचार करता त्याला कासारवडवली पर्यंत वाढविण्यात आला आहे.

३.२ वडाळा पासून घाटकोपर येथे सेन्ट्रल रेल्वे लाईन ओलांडून लाल बहादूर शास्त्री मार्गे तीन हात नाका (ठाणे) पर्यंत व तद्नंतर सदर मार्ग घोडबंदर रोड मार्गे कासारवडवलीपर्यंत मार्गक्रम करतो. वडाळा ते कापुरबावडीपर्यंत हा मार्ग भुयारी असून त्यानंतर उन्नत मार्ग राहणार आहे. सदर मार्गाची एकूण लांबी ३२ कि.मी. असून त्यापैकी २७ कि.मी. लांबी भुयारी असेल.

३.३ सदर मार्गात एकूण ३० स्थानके असतील. याकरिता ओवाळे आणि घाटकोपर या दोन ठिकाणी कार डेपोची निवड केली असून गरज पडल्यास इतर ठिकाणी देखील डेपोची व्यवस्था करता येईल. सदर मार्गात दररोज सुमारे ७.६९ लक्ष प्रवासी प्रवास करतील. २०३१ मध्ये ही संख्या ११.९२ लक्षपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

३.४ या मार्गाचे प्रस्तावित सुरुवातीचे भाडे हे मेट्रो मार्ग-३ च्या भाडयाच्या दरानुसार सुचविण्यात आले असून त्यात पुढील सुधारणा Fare Fixation Committee मार्फत करण्यात येईल.

३.५ सदर प्रकल्पाची एकूण मुळ किंमत रु. १९,०९७/- कोटी एवढी असून निधी उभारणीचे स्वरुप खालील प्रमाणे राहील :-

| **निधी उभारणीचे स्वरुप :** | **समभाग** |
|---|---|
| केंद्र शासन यांच्या मार्फत समभाग व दुय्यम कर्ज (प्रस्तावित) | २०% पर्यंत |
| राज्य शासन / मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा समभाग<br>**राज्य शासन यांच्या मार्फत दुय्यम कर्ज**<br>केंद्र शासन कराच्या ५०%<br>राज्य शासन कराच्या १००% प्रस्तावित | ३०% पर्यंत* |
| बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्यामार्फत कर्ज (प्रस्तावित) | अंदाजे ५०% |

*** टीप - मालमत्ता विकासाद्वारे मिळणारे उत्पन्न या ३०% राज्य शासनाच्या समभागामध्ये समाविष्ट आहे.**

३.६ वरील प्रकल्पाच्या सर्व मुद्दयांवर सविस्तर माहिती देऊन महानगर आयुक्त यांनी प्रकल्पास प्राधिकरणाची मान्यता मिळण्याचे प्रस्तावित केले. त्यांनी असेही स्पष्ट केले की, प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव राज्याच्या मंत्रिमंडळाच्या परवानगीकरिता सादर केला जाईल व तद्नंतर केंद्रशासनाकडे पाठविला जाईल. सदर प्रकल्प ६ ते ७ वर्षात पूर्ण करण्यात येईल.

३.७ प्राधिकरणाच्या सदस्या श्रीमती स्नेहल आंबेकर, महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मेट्रो प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या सेवावाहीन्यांचा मुद्दा उपस्थित करुन अशी सुचना केली की, ज्या भागातून मेट्रो मार्गक्रम करते त्या भागातील सेवावाहीन्या कमीत कमी स्थलांतरीत करण्यात याव्यात. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो लाईन - १ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (पूर्णपणे उन्नत मार्ग) च्या अंमलबजावणी दरम्यान आलेल्या अडचणींचा अनुभव लक्षात घेऊन, सदर प्रकल्प भुयारी प्रस्तावित असून स्थानकांकरीता लागणाऱ्या जमिनीवरील सेवावाहिन्यांना कमीत कमी स्थलांतरीत करण्याचा विचार करण्यात येईल. त्याबाबत संबंधित महानगर पालिकेशी समन्वय साधून तेथील सेवावाहीन्या स्थलांतरीत करण्यात येतील.

३.८ प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी सुचना केली की, मेट्रो मार्ग - १ च्या कामामुळे खराब झालेल्या जे.पी रोडची प्राधिकरणाने सुधारणा करावी, तसेच त्यांनी असेही मत नोंदविले की, वर्सोवा येथील प्रवाशी २ ते २.५ कि.मी. प्रवास करुन मेट्रो वापरण्याकरिता येतात. तरी मेट्रो मार्ग- १ वर्सोवा गावापर्यंत वाढविण्यात यावा जेणेकरुन त्या भागातील

रहीवाश्यांना मेट्रोचा वापर करणे सुलभ होईल. प्राधिकरणाचे निमंत्रित श्री. सुरेश टोकरे, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद यांनी अशी सुचना केली की, नुकताच नवी मुंबई विमानतळ प्रकल्प मार्गी लागला असून नवी मुंबई विमानतळ प्रकल्प मुंबई विमानतळाशी मेट्रो मार्गाने जोडण्यात यावा.

३.९ प्राधिकरणाचे सदस्य श्री. मुनकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, स्थानक प्रभावित क्षेत्र सुधारणा व एकीकरण योजना हा सविस्तर प्रकल्प अहवालाचा भाग असून त्याची अंमलबजावणी प्रकल्पासोबतच करण्यात यावी तसेच त्याची किंमत प्रकल्पात समाविष्ट करण्यात यावी.

३.१० या प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा मुंबई मेट्रो रेल महामंडळ यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात यावे, त्यामुळे प्रकल्पाची अंमजबजावणी सुरळीतरित्या पार पाडणे सोयिस्कर होईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

३.११ प्राधिकरणाचे सदस्य श्री. स्वाधीन क्षत्रिय, मुख्य सचिव यांनी अशी सुचना केली की, प्रकल्प बाधितांकरीता २६९ स्के.फूटची सदनिका देण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केले आहे. परंतू मुंबई नागरी परिवहन प्रकल्प / पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या धोरणाअंतर्गत प्रकल्प बाधितांना २२५ स्के.फूटची सदनिका देण्याचे प्रस्तावित आहे. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासनाच्या सुधारीत धोरणानुसार प्रकल्प बाधितांना २५ चौ. मी. ची घरे देण्यात येतील.

३.१२ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला **:-**

**<u>ठराव क्र. १३२८ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, बाब टिप्पणी मध्ये दिलेल्या प्रस्तावास मान्यता देत आहे. त्यानुसार पुढील ठरावास मान्यता देण्यात येत आहेः-

१. "मेट्रो लाईन - ५" वडाळा -घाटकोपर-तीन हात नाका (ठाणे) कासारवडवली (अंशतःउन्नत/भुयारी) या ३२ कि.मी. लांबींच्या मेट्रो प्रकल्पास मान्यता देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

२. सल्लागारांनी तयार केलेल्या सदर मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता तसेच प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान मार्गिकामध्ये (Alignment) गरज भासल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये नमुद केल्यानुसार निधी उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. या प्रकल्पाला अंदाजे ५०% कर्ज सहाय्य हे बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात घेणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

५. सदर प्रकल्प "मुंबई मेट्रो रेल महामंडळ" (MMRC) मार्फत अंमलबजावणी करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेणेसाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला प्राधिकृत करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

७. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभाल आगारासाठी मौजे ओवळे येथील २५ हेक्टर व घाटकोपर येथील १६ हेक्टर/उपलब्धतेनुसार किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर जमीनीच्या वापरास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार आवश्यक ते बदल करण्यास राज्य शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे.

८. अतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवाशी /वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे. तसेच कार डेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ /नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मेट्रो मार्ग - ५ वडाळा-घाटकोपर-तीन हात नाका (ठाणे) - कासारवडवली रेल्वे मार्गाच्या प्रस्तावित प्रवासी भाडे दरास मान्यता देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

..९/-

१०. सदर मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या विविध कर/शुल्काच्या ५०% हिश्श्याकरीता व सदर प्रकल्पासाठी आवश्यक खाजगी जमिनीच्या संपादनाकरीता तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत यावरील खर्चासाठी राज्य शासनामार्फत मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. तसेच सदर प्रकल्पास लागू होणा-या राज्य शासनाच्या तसेच स्थानिक करांपोटी राज्य शासनातर्फे सदर SPV कंपनीला बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

१२. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियम क्र. ९ (DCR 9) मध्ये निर्गमित केलेल्या ७५:२५ या भागीदारी धोरणाप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक ते योग्य बदल करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

१३. शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्याकरिता राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे. तसेच प्राधिकरणाकडे प्राप्त होणारी सदर जमीन मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४. सदर प्रकल्पालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकामाच्या कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी तसेच संबंधित विभागांनी सदर मोकळ्या जागा मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला सुपूर्द करण्याबाबत संबंधित विभागांस निर्देश देण्याकरिता राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५. मेट्रो रेल्वे स्थानक व कार डेपोच्या जागेचा व्यावसायिक वापर करण्यास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१६. सदर प्रकल्पांतर्गतच्या प्रकल्पबाधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेने सहमती घेऊन "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP -R & R Policy)" नुसार करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे.

१७. सदर प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा मुंबई मेट्रो रेल महामंडळ यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी सुरळीतरित्या पार पाडणे सोयिस्कर होईल.

१८. वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका) कासारवडवली मेट्रो हा प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मेट्रो सुधारित मार्ग - २ : दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो प्रकल्प : सविस्तर प्रकल्प अहवाल - प्रकल्प अंमलबजावणीकरीता शासनाची मान्यता घेण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पूर्वी प्रस्तावित असलेला ३१.८ कि.मी. लांबीचा व २७ स्थानके असलेला बांधा - वापरा - हस्तांतरीत करा/ सार्वजनिक खाजगी तत्वावरील चारकोप - वांद्रे - मानखुर्द हा रु. ७६६० कोटी प्रकल्पाची किंमत असलेल्या उन्नत मार्ग सवलतदार रिलायन्स कंपनीला देण्यात आला होता. या मार्गाबद्दल स्थानिक रहिवाश्यांनी दर्शविलेला विरोध, चारकोप व मानखुर्द येथील देखभाल व दुरुस्तीसाठी लागणाऱ्या किनारा नियमन क्षेत्राच्या जटील अटी, मेट्रो स्थानकांवर वाणिज्यिक वापरासाठी आवश्यक असलेले बदल, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये न होणे इत्यादी अनेक कारणांमुळे सदर प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नाही. सदर परिस्थिती लक्षात घेता राज्य शासनाने सदर करारनामा रद्द केला आहे.

४.२ दरम्यानच्या काळात शासनाच्या निर्देशानुसार मे.राईटस् या सल्लागार संस्थेला, मेट्रो लाईन -२ चारकोप - वांद्रे-मानखुर्द आणि मेट्रो लाईन -४ चारकोप- दहिसर या मेट्रोमार्गाचा फेरविचार करुन, मेट्रो लाईन - २ हा प्रकल्प दहिसर पर्यंत वाढविण्याची शक्यता पडताळणी व अंशतः/ पूर्णतः भुयारी मार्गाची व्यवहार्यता तपासून, सुधारीत दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या एकत्रित मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम सोपविण्यात आले. सदर सल्लागारामार्फत सुधारीत पुर्णतः भुयारी दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल ऑगस्ट, २०१४ मध्ये सादर झाला.

४.३ सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर भुयारी मेट्रो मार्ग पश्चिम द्रुतगती मार्ग दहिसर (पूर्व) येथून लिंक रोड मार्गे पश्चिम रेल्वे ओलांडून दक्षिणेकडे कांदरपाडा रोड, एल.आय.सी कॉलनी, कस्तुरी पार्क, एकता नगर, कांदीवली पश्चिम मार्गे चारकोप पर्यंत येतो. त्यानंतर सदर मार्गिका लिंक रोड वरुन नविन लिंक रोड, वालावलकर मार्ग, कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी मार्ग, वैकूंठलाल मेहता मार्गाव्दारे-मालाड, कस्तूरी पार्क, बांगुर नगर, ओशिवरा, शास्त्री नगर व डी.एन. नगर येथील मेट्रो मार्ग १ ला

ओलांडून इ.एस.आय.सी नगर आणि जे.व्ही.पी.डी कडे जाते. त्यानंतर मेट्रो मार्ग स्वामी विवेकानंद रोड, लिंकींग रोड आणि टर्नर रोड वरुन वांद्रे (प) येथे उपनगरीय रेल्वे सेवेशी प्रवासी अदलाबदलीची सुविधा पुरवून वांद्रे - कूर्ला संकुल रोड वरुन कूर्ला (प) पर्यंत जातो. त्यानंतर सदर मार्ग कुर्ला रेल्वे स्थानक (मध्य व हार्बर रेल्वे) येथे प्रवासी अदलाबदलीची सुविधा पुरवून स.गो. बर्वे मार्गावर येऊन व्ही.एन.मार्गाव्दारे मानखुर्द पर्यंत मार्गक्रम करतो.

४.४ सदर मार्गाची लांबी ४० कि. मी. असून हा मार्ग पूर्णतः भुयारी राहणार आहे. या मार्गावर ३६ स्थानके असणार. चारकोप व मंडाले येथे २ कार डेपो प्रस्तावित करण्यात आले असून गरज पडल्यास यात बदल करता येईल. सुरुवातीला दैनंदिन प्रवासी संख्या १६.१ लाख अपेक्षित असून २०३१ पर्यंत ही संख्या २१.१ लाखापर्यंत जाण्याची शक्यता आहे.

४.५ या मार्गाचे प्रस्तावित सुरुवातीचे भाडे हे मेट्रो मार्ग-३ च्या भाडयाच्या दरानुसार सुचविण्यात आले असून त्यात पुढील सुधारणा Fare Fixation Committee मार्फत करण्यात येईल.

४.६ सदर प्रकल्पाची एकुण मुळ किंमत रु. २५,६०५/- कोटी एवढी असून निधी उभारणीचे स्वरुप खालील प्रमाणे आहे :-

| **निधी उभारणीचे स्वरुप :** | **समभाग** |
|---|---|
| केंद्र शासन यांच्या मार्फत समभाग व दुय्यम कर्ज (प्रस्तावित) | २०% पर्यंत |
| राज्य शासन / मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा समभाग<br>**राज्य शासन यांच्या मार्फत दुय्यम कर्ज**<br>केंद्र शासन कराच्या ५०%<br>राज्य शासन कराच्या १००% प्रस्तावित | ३०% पर्यंत* |
| बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्यामार्फत कर्ज (प्रस्तावित) | अंदाजे ५०% |

*** टीप - मालमत्ता विकासाद्वारे मिळणारे उत्पन्न या ३०% राज्य शासनाच्या समभागामध्ये समाविष्ट आहे.**

४.७ या प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा मुंबई मेट्रो रेल महामंडळ यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात यावे, त्यामुळे प्रकल्पाची अंमजबजावणी सुरळीतरित्या पार पाडणे सोयिस्कर होईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

४.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३२९:**

**''असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, बाब टिप्पणी मध्ये दिलेल्या प्रस्तावास मान्यता देत आहे. त्यानुसार पुढील ठरावास मान्यता देण्यात येत आहे :-

१) ''सुधारित मेट्रो मार्ग-२'' **दहिसर- चारकोप - वांद्रे -मानखुर्द** या प्रकल्पास मान्यता देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

२) सल्लागारांनी तयार केलेल्या सदर मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता तसेच प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान मार्गिकामध्ये (Alignment) गरज भासल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्प टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समभाग भागभांडवल उभारुन पूर्ण करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

४) या प्रकल्पाला अंदाजे ५०% कर्ज सहाय्य हे बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात घेणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

५) सदर प्रकल्प "मुंबई मेट्रो रेल महामंडळ" (MMRC) मार्फत अंमलबजावणी करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेणेसाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला प्राधिकृत करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

७) मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभाल आगारासाठी चारकोप आणि मंडाले येथील जमीन व उपलब्धतेनुसार किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर जागा वापरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार आवश्यक ते बदल करण्यास राज्य शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे.

८) अतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवाशी /वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरित करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे. तसेच कार डेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ /नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मेट्रो मार्ग-२ दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द रेल्वे मार्गाच्या प्रस्तावित प्रवासी भाडे दरास मान्यता देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

१०) सदर मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या विविध कर/शुल्काच्या ५०% हिश्श्याकरीता व सदर प्रकल्पासाठी आवश्यक खाजगी जमिनीच्या संपादनाकरीता तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत यावरील खर्चासाठी राज्य शासनामार्फत मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११) तसेच सदर प्रकल्पास लागू होणा-या राज्य शासनाच्या तसेच स्थानिक करांपोटी राज्य शासनातर्फे सदर SPV कंपनीला बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

१२) शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्याकरिता राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणाकडे प्राप्त होणारी सदर जमीन मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकामाच्या कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी तसेच संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला सुपूर्द करण्याबाबत संबंधित विभागांस निर्देश देण्याकरीता राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४) मेट्रो रेल्वे स्थानक व कार डेपोच्या व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमीनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई मेट्रो रेल महामंडळ या SPV कंपनीला देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

१५) सदर प्रकल्पांर्गतच्या प्रकल्पबाधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेची सहमती घेऊन "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP -R & R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

१६) सदर प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा मुंबई मेट्रो रेल महामंडळ यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे प्रकल्पाची अंमजबजावणी सुरळीतरित्या पार पाडणे सोयिस्कर होईल.

१७) ''मुंबई मेट्रो मार्ग-२'' दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द रेल्वे मार्ग हा प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : कलानगर जंक्शन येथील उड्डाणपुलांच्या प्रस्तावित बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाविषयी माहिती देताना प्राधिकरणाचे मुख्य अभियंता, श्री. एस.एम.सबनीस यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण केले. सादरीकरणावेळी त्यांनी असे नमूद केले की, कलानगर जंक्शन हे मुंबईतील प्रचंड वर्दळीचे जंक्शन असून विशेषतः सकाळी व संध्याकाळी वाहतुकीची प्रचंड कोंडी होताना आढळते. वांद्रे-कुर्ला संकुल हे एक आंतरराष्ट्रीय वित्तीय व व्यापार केंद्र असून त्याच्या उन्नत्तीकरिता व उपरोक्त बाबी विचारात घेता वांद्रे-कुर्ला संकुलातील परिवहन व्यवस्था सुसाध्य होणे अत्यावश्यक आहे. त्यास्तव दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९ व्या बैठकीत कलानगर जंक्शन येथे उड्डाणपुल व भूयारी मार्गाच्या बांधकामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. या बैठकीत याबाबतचे अधिकार मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांचेकडे असावेत असे सर्वानुमते ठरले. तद्नंतर, मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सर्वंकष विचार करुन प्रस्ताव फेरसादर करण्याची सूचना केली होती.

५.२ त्यापुढे असेही नमूद केले की, उपरोक्त बैठकीत प्रस्तावात समाविष्ट असलेल्या वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा उड्डाणपुल तसेच सी-लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुल व वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम

द्रुतगती महामार्गाच्या दिशेने जाणाऱ्या भुयारी वाहनमार्गाच्या बांधकामाचा समावेश होता. सदर प्रकल्पाचा एकूण अंदाजे खर्च रक्कम रु.४७० कोटी इतका होता. भूयारी मार्गांचे बांधकाम टनेल बोअरींग या अत्याधुनिक यंत्राने करणे अपेक्षित होते परंतु त्या काळात रुपयाची डॉलरच्या तुलनेने घसरलेली किंमत लक्षात घेता टनेल बोअरींग यंत्रावरील आयातीचा खर्च खुपच जास्त असल्याने प्रकल्पाच्या एकूण किंमतीत लक्षणीय वाढ होणे संभवनीय असल्याचे दिसून आले. यास्तव टनेल बोअरींग यंत्राने काम करण्याच्या बाबतच्या प्रस्तावाचा पुनर्विचार करणे क्रमप्राप्त ठरले.

५.३ त्यानंतर, दरम्यानच्या काळात सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता खुला करण्यात आल्यामुळे कुर्ला व धारावीकडून येण्या-या वाहनांच्या संख्येत प्रथमदर्शनी बदल दिसून आला. या कारणास्तव कलानगर जंक्शन येथील वाहतुकीचा पुन्हा एकदा नव्याने सविस्तर अभ्यास करण्याची गरज भासली. वाहतूकीवर सांताक्रुझ - चेंबूर जोडरस्त्यामूळे झालेल्या बदलांचा अभ्यास मे, २०१४ मध्ये करण्यात आला. प्रमाणित सॉफ्टवेअर प्रणाली वापरुन (प्रत्यक्ष वाहतूक वर्दळीवर आधारीत असे) या जंक्शनवरील वाहतूकीचे सिम्युलेशन तयार करण्यात आले. वाहतूकीचा अभ्यास करतांना या जंक्शनवर वर्दळीच्या वेळेस सुमारे १२,३०२ पॅसेंजर कार युनिट (PCU) प्रती तास इतक्या वाहनांची वर्दळ असल्याचे दिसून आले. त्यात जास्तीत जास्त वाहने सिग्नल विरहीत प्रवास कशी करु शकतील यादृष्टीने वेगवेगळया पर्यायांचा अभ्यास करण्यात आला. त्यात खालीलप्रमाणे वाहतूक व्यवस्था असल्यास वाहतूकीच्या अंदाजे ६६% इतक्या वाहतूकीस लाभ होईल असे निदर्शनास आले :-

अ) वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा उड्डाणपुल

ब) वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा उड्डाणपुल

क) सी-लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुलकडे जाणारा उड्डाणपुल

ड) धारावी ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा उड्डाणपुल

इ) धारावीकडून सी-लिंककडे जाणारा रस्ता

५.४ मुख्य अभियंता यांनी पुढे असेही सांगितले की, उपरोक्त चारही उड्डाणपुलांचा, रस्त्याचा व अनुषंगिक बाबींच्या बांधकामांचा एकूण खर्च अंदाजे रक्कम रु.२२७ कोटी इतका होत असून सदर प्रस्तावाची रक्कम पूर्वीच्या भूयारी वाहन मार्गाच्या बांधकामाच्या प्रस्तावित रकमेपेक्षा निम्म्याने कमी आहे. वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा उड्डाणपुल तसेच सी-लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुलाकडे येणारा दोन पदरी उड्डाणपुल प्रस्तावित आहे. तसेच धारावी कडून पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणा-या

उड्डाणपुलास वांद्रे-कुर्ला संकुलाकडून येणारा उड्डाणपुल कलानगर जंक्शन येथे व्दितीय स्तरावर येऊन मिळतो व तेथून पुढे पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दिशेने जाणारा उडडाणपुल तीन पदरी बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर धारावी कडून सी-लिंककडे जाणारी वाहतूक अव्याहत होण्यासाठी शासन मालकीच्या जागेवरुन धारावी ते सी-लिंककडे जाणा-या वाहतूकीसाठी १२.०० मीटर रुंदीच्या रस्त्याचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उपरोक्त बांधकामांचा व अनुषंगिक बाबींचा एकूण खर्च अंदाजे रक्कम रु.२२७ कोटी इतका आहे.

५.५ याबाबत मुख्य अभियंता यांनी असे नमूद केले की, प्रस्तावित उड्डाणपुलांचा काही भाग व धारावी ते सी-लिंककडे जाणारा रस्ता हा नंदादीप उद्यानाच्या शेजारील शासन मालकीच्या जागेवरुन जात असल्याने सदर जागेवरील सार्वजनिक बांधकाम विभागाचे तसेच उत्पादन शुल्क विभागाची कार्यालये तात्पुरत्या कालावधीसाठी स्थलांतरीत करावी लागतील. उड्डाणपुलांखालील काही भूभाग तटीय किनारा नियंत्रण (क्षेत्र-२) मध्ये येत असून त्यास महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून उड्डाणपुलांच्या तसेच रस्त्याच्या बांधकामास परवानगी घेण्यात येईल.

५.६ प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी नंदादीप उद्यानाजवळून जाणा-या रस्त्याऐवजी भुयारी मार्ग करावा जेणेकरुन उद्यानाची जागा बाधीत होणार नाही असे सुचविले. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, नंदादीप उद्यानाची जागा ही प्रस्तावित रस्ता व उड्डाणपुलामुळे बाधीत होत नाही. तसेच मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी भुयारी मार्गाची अंदाजित किंमत उड्डाणपुलाच्या तुलनेत बरीच जास्त असल्याने तो पर्याय सर्वसाधारणपणे व्यवहार्य ठरणार नाही असे मत व्यक्त केले.

५.७ चर्चेअंती, प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :

**ठराव क्र. १३३० :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे खालील प्रकारच्या उड्डाणपुल व रस्त्याच्या तसेच अनुषंगीक बाबींच्या बांधकामांसाठीच्या एकूण खर्चास अंदाजे रक्कम रु.२२७ कोटींच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे :-

अ) वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा उड्डाणपुल

ब) वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा उड्डाणपुल

क) सी-लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुलकडे जाणारा उड्डाणपुल

ड) धारावी ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा उड्डाणपुल

इ) धारावीकडून सी-लिंककडे जाणारा रस्ता

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वर नमूद केलेले उड्डाणपुल व रस्त्याच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली शासन मालकीची जागा उपलब्ध होण्यास्तव शासनास शिफारस करण्यात येत आहे व त्याबद्दल आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६ :</u>** **<u>वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंड क्र.आरजी-१-ए च्या भाडेपट्टाकराराबाबत.</u>**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे.रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील आरजी-१-ए हा ३७,२५२ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड बगीचा व जमिनीखाली ६७,०९२ चौ.मी. क्षेत्रफळ असलेले २ मजली वाहनतळांचे बांधकाम करण्याकरीता भाडेपट्टयाने वाटप करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार एकूण रु.११,००,००१/- (रुपये अकरा लाख एक) भरुन प्राधिकरणासोबत दिनांक १३ जुलै, २००७ रोजी भाडेपट्टाकरार केला आहे. निविदा पुस्तिकेमधील अट क्र.४.१३(एस्) प्रमाणे मे.रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेडला (भाडेपट्टेदार) भाडेपट्टाकराराच्या दिनांकापासून ४ वर्षात बांधकाम पूर्ण करण्यासाठी रु.५० कोटीची बँक गॅरंटी प्राधिकरणास देय होती.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, भाडेपट्टेदाराने दिनांक २५ जुलै, २००७ रोजी प्राधिकरणास स्टेट बँक ऑफ इंडियाची रु.५० कोटीची बँक गॅरंटी सादर केली होती. सदर बँक गॅरंटी दिनांक २५ जुलै, २००७ ते दिनांक १७ जुलै, २०११ पर्यंत वैध होती. मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड यांनी त्यांच्या दिनांक १५ जुलै, २०११ रोजीच्या पत्राद्वारे विकसनाबाबतचा हेतू साध्य करण्यासाठी बँक गॅरंटीची वैधता पुढे वाढविण्याची विनंती केली होती. प्राधिकरणाच्या दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या १३१व्या बैठकीत, ठराव क्र.१२८५ अन्वये, मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड (भाडेपट्टेदार) यांनी

सादर केलेली बँक गॅरंटीची वैधता पुढील तीन वर्षापर्यंत म्हणजेच दिनांक १७ जुलै, २०१४ पर्यंत वाढविण्यास मान्यता दिली. तसेच बांधकाम पूर्ण करण्याच्या कालावधीत अतिरिक्त अधिमूल्य आकारुन वाढ देण्यासही मान्यता दिली. त्याप्रमाणे मे.रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड यांनी त्यांच्या दिनांक १६ जुलै, २०१३ रोजीच्या पत्राद्वारे प्राधिकरणास ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्सची रु.५० कोटीची बँक गॅरंटी सादर केली. सदर बँक गॅरंटी ही दिनांक १७ जुलै, २०१४ पर्यंत वैध होती.

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड यांनी त्यांच्या दिनांक १० जुलै, २०१४ रोजीच्या पत्राद्वारे बांधकाम पुर्णत्वाचे नकाशे सादर केले असून प्राधिकरणास ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्सची रु.५० कोटीची बँक गॅरंटीची वैधता दिनांक १७ जुलै, २०१४ ते दिनांक १६ एप्रिल, २०१५ पर्यंत वाढवून सादर केली आहे. याबाबत त्यांनी असे सांगितले की, भाडेपट्टेदाराने प्राधिकरणास विनंती केली आहे, त्यातील ठळक मुद्दे असे की, प्रमुख अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे वापरासाठीचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरण भोगवटा प्रमाणपत्र देऊ शकेल. तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर बेसमेंट-१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सार्वजनिक वाहनतळासाठी विनामुल्य सुपूर्द करण्याबाबत सगळे सोपस्कार पूर्ण होतील. मे.रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी सादर केलेली बँक गॅरंटीची वैधता नमूद केलेल्या कारणांमुळे, दिनांक १६ एप्रिल, २०१५ पर्यंत वाढवून देण्याबाबत कार्योत्तर मान्यता मिळावी म्हणून प्रस्तावित केले आहे.

६.४ या प्रस्तावाबाबत मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले की, भाडेपट्टेदाराने सादर केलेली बँक गॅरंटीची वैधता दिनांक १६ एप्रिल, २०१५ पर्यंत वाढवून देणेबाबत मान्यता देण्यास हरकत नाही, परंतू मे.रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (भाडेपट्टेदार) यांनी दिनांक १६ एप्रिल, २०१५ पर्यंत बांधकाम पूर्ण केले नाही तर त्यांनी पुढील बांधकाम पुर्ण करण्याच्या कालावधीत वाढ मागितल्यास भाडेपट्टेदारास अधिमूल्याच्या सध्याच्या दराच्या दुप्पट दराने अतिरिक्त अधिमूल्य आकारुन त्यांना पुढील बांधकाम पुर्ण करण्याच्या कालावधीत वाढ देण्यात यावी.

६.५ त्यानंतर, बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने बाब टिप्पणीस मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १३३१ :</u>**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास

सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे मे.रिलायन्स इंडस्ट्रिज लि. (भाडेपट्टादार) यांनी वांद्रे-कुर्ला संकुलातील ''जी'' ब्लॉकमधील भूखंड क्र.आरजी-१-ए च्या बाबत सादर केलेली बँक गॅरेंटीची वैधता दिनांक १६ एप्रिल, २०१५ पर्यंत वाढविण्याची कार्योत्तर मान्यता देत आहे.

**''असाही ठराव करण्यात येत आहे की,** भाडेपट्टेदाराने दिनांक १६ एप्रिल, २०१५ पर्यंत बांधकाम पूर्ण केले नाही, तर भाडेपट्टेदाराने पुढील बांधकाम पुर्ण करण्याच्या कालावधीत वाढ मागितल्यास भाडेपट्टेदारास अधिमूल्याच्या सध्याच्या दराच्या दुप्पट दराने अतिरिक्त अधिमूल्य आकारुन त्यांना पुढील बांधकाम पुर्ण करण्याच्या कालावधीत वाढ देण्यास मान्यता देत आहे.

**''असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.''

**बाब क्र.७ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ जून, २०१४ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४**

७.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाकडील असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालासंबंधी माहिती दिली.

७.२ त्यानंतर, दिनांक ०१ जून, २०१४ ते ३१ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**पटल बाब क्र. १ : प्रदर्शने, व्यापारी जत्रा, संगीत व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मोकळी असलेली जमीन तात्पुरत्या स्वरुपावर अनुज्ञाप्ती शुल्क आकारुन देणे.**
**मुंबई विद्यापीठास ''102nd Session of Indian Science Congress in 2015'' या कार्यक्रमासाठी विनाशुल्क जमिन उपलब्ध करुन देणेबाबत...**

या प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील मोकळी जमीन / भूखंड, प्राधिकरणाच्या दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या १३१व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१२९१ अन्वये ठरविलेल्या धोरणानुसार व दरानुसार अनुज्ञाप्ती शुल्क (लायसन्स फी) आकारुन प्रदर्शने व विविध कार्यक्रम इत्यादीसाठी तात्पुरत्या वापरासाठी दिली जाते. तसेच ज्या मोकळया जमिनी / भूखंड सदरच्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे, अशा भूखंडाचे

विविध आकारमानामध्ये विभाजन सोईच्या दृष्टीने केले आहे व त्याप्रमाणे भूखंडाचे वितरण केले जाते. सदरचा कोणताही भूखंड विभागून दिला जात नाही. अगदीच अपवादात्मक परिस्थिती उद्‌भवल्यास भूखंडाची विभागणी केली जाते.

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई विद्यापीठ यांनी "102nd Session of Indian Science Congress in 2015" या कार्यक्रमाची व्याप्ती व रुपरेषा विषद करुन, वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-टेक्स" ब्लॉकमधील ८८,५०० चौ.मी. इतकी जमीन उपलब्धतेनुसार दिनांक ०७/१२/२०१४ ते ११/०१/२०१५ या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपावर विनामुल्य वितरीत करण्याची विनंती केली आहे. त्यांनी असेही नमूद केले आहे की, सदरच्या कार्यक्रमाचा उद्देश सुप्रसिध्द वैज्ञानिक, विद्याव्यसंगी संशोधक यांना एकत्र आणून विज्ञान लोकप्रिय करणे व विज्ञानाच्या स्वभाव गुणधर्माचे संगोपन करण्याबाबत वैज्ञानिक व संशोधक यांच्यामध्ये भावना निर्माण करणे असा आहे. सदरच्या कार्यक्रमाकरीता देशभरातून १२००० पेक्षा अधिक प्रतिनिधी येण्याची अपेक्षा आहे. तसेच सदरच्या कालावधीत काही थोर व्याख्याते, सुप्रसिध्द वैज्ञानिक व संशोधक यांना भारतातून तसेच परदेशातून आमंत्रित करण्यात येणार आहे.

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई विद्यापीठ आयोजित करीत असलेला सदरच्या कार्यक्रमासाठी मागणी केल्यानुसार विनाशुल्क जमीन वितरण करावयाची झाल्यास सद्यःस्थितीत लागू असलेल्या धोरणानुसार मान्य करता येणार नाही. तथापि, प्राधिकरण याबाबत निर्णय घेण्यास सक्षम आहे. सबब सदर कार्यक्रमाची रुपरेषा, उद्देश व प्रयोजन विचारात घेता प्राधिकरणाच्या मान्यतेसापेक्ष व सदरची संस्था शासकिय / निम्न शासकिय प्रवर्गात येत असल्याने या प्र-वर्गासाठी असलेला निर्धारित दर आकारुन प्राधिकरणाच्या दिनांक १२.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विविध अटी व शर्ती नमूद करुन त्यांना जमीन वितरणाचे पत्र देण्यात आले आहे. सदरच्या पत्रान्वये ८८,५०० चौ.मी. जमिनीचे अनुज्ञाप्ती शुल्क रु.१,२९,६२,५००/- अधिक सेवा कर रु. १६,०२,१६५/- व अनामत रक्कम रु. ९७,२१,८७५/- अशी एकूण रु. २,४२,८६,५४०/- (सेवा करासहीत) इतकी रक्कम येत आहे.

प्राधिकरणाचे सदस्य श्री. यशोधर फणसे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे मत मांडले की, मुंबई मधील फोर्ट विभागातील क्रॉस मैदान, दादर येथील शिवाजी पार्क इत्यादी मैदानावर सभा / संमेलने, सामाजिक कार्यक्रम इत्यादीसाठी परवानगी देण्यात येत नाही. त्यामुळे राजकीय पक्ष, सामाजिक संस्था यांना सध्या फक्त वांद्रे-कुर्ला संकुलातील उपलब्ध असलेल्या जमिनीशिवाय दुसरा

पर्याय उपलब्ध नाही. परंतु वांद्रे-कुर्ला संकुलातील या जमिनीचे असलेले भाडयाचे दर अशा संस्थांना परवडणारे नाहीत. त्यामुळे मा. अध्यक्ष महोदयांनी अशा संस्थांना सवलतीच्या दराने भाडे आकरणीबाबत विचार करावा अशी विनंती केली.

मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी उपरोक्त बाबत वेगळा विचार करुन नंतर योग्य निर्णय घेता येईल असे सांगितले.

मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे मत व्यक्त केले की, मुंबई विद्यापीठ आयोजित करीत असलेल्या सदरच्या कार्यक्रमास शासनानेही अनुदान मंजूर केले आहे. कार्यक्रमाचा उद्देश व प्रयोजन विचारात घेता, त्यांनी केलेली विनंती विचारात घेण्यास हरकत दिसत नाही. तथापि, वितरीत केलेली जमीन पूर्ववत करुन देण्याची खबरदारी मुंबई विद्यापीठाने घ्यावी व त्याकरीता काही रक्कम त्यांनी प्राधिकरणास अदा करावी. तसेच मुंबई विद्यापीठाने बांधकाम उभारणी व बांधकाम निष्कासन कालावधी कमी करण्याबाबत विचार करावा, अशीही सूचना केली.

त्यानंतर, बाब टिप्पणीमधील प्रस्ताव विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला : -

**ठराव क्र. १३३२ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. ४ व ५ मध्ये नमूद केलेले कार्यक्रमाचे प्रयोजन व उद्देश विचारात घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४चे कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेला अधिकारांच्या आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे प्राधिकरणाच्या दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या १३१व्या बैठकीमधील ठराव क्र. १२९१ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीची वांद्रे-कुर्ला संकुलामधील मोकळी जमीन / भूखंड मुंबई विद्यापीठ आयोजित करीत असलेल्या 102nd Session of Indian Science Congress in 2015 या कार्यक्रमासाठी व वाहनतळासाठी शुल्क (अनुज्ञाप्ती शुल्क, अनामत रक्कम, इ.) न आकारता विनाशुल्क दिनांक ७ डिसेंबर, २०१४ ते १४ जानेवारी, २०१५ या कालावधीकरीता (दिनांक ०७.१२.२०१४ ते ०२.०१.२०१५ - बांधकाम उभारणे; दिनांक ०३.०१.२०१५ ते ०७.०१.२०१५ - प्रत्यक्ष कार्यक्रम व वाहनतळ आणि दिनांक ०८.०१.२०१५ ते १४.०१.२०१५ - बांधकाम निष्कासन) नियत अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देत आहे. तथापि, वितरीत केलेली जमीन पुर्ववत करण्याची खबरदारी मुंबई विद्यापीठाने घ्यावी व त्याकरीता काही रक्कम मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात यावी. सदर रक्कम महानगर आयुक्त यांनी ठरवावी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

----------xox-----------